# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील २८०२१ खेड्यांपैकी २१११८ गावात स्मशान भुमी नसल्याबाबत

**(१) १९१९८ (१७-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २८ हजार २१ खेड्यांपैकी २१११८ गावत स्मशान भुमी नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सन २००१ मध्ये ग्रामविकास विभागाने निर्गमीत केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी जिल्हा परिषदेकडून होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, सर्व गावांना स्मशान भुमीची सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) “ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान” या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ज्या गावांमध्ये दहन/दफनभूमीसाठी ग्रामपंचायतीच्या किंवा शासनाच्या मालकीची जमीन उपलब्ध नसेल अशा गावांसाठी जमीन संपादित करणे व इतर अनुषंगिक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. तथापि, निधीची उपलब्धता व कामांची निकड लक्षात घेऊन निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना योग्य प्रकारे समन्वय ठेवून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**पनवेल शहरालगत असलेल्या गावातील ग्रामपंचायतीकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याबाबत**

**(२) १९५३२ (१४-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहरालगत असलेल्या गावातील ग्रामपंचायतकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याने हा कचरा परिसरातील महामार्ग आणि नद्यांच्या पात्रालगत टाकला जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नद्यांना डम्पिंग ग्राऊंडचे स्वरुप प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, काही प्रमाणात कचऱ्याचे ढिग आढळून आले. तथापि, ग्रामपंचायती मार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली.

(४) ज्या ग्रामपंचायतीकडे डंपींग ग्राउंडची व्यवस्था नाही अशा ग्रामपंचायतीकडील कचरा टाकण्यासाठी सिडको व एम.आय.डी.सी. यांच्या अधिनस्त असलेले डंपींग ग्राऊंड उपलब्ध करुन देणेबाबत त्यांना विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेणच्या (जि.रायगड) खारेपाटातील दुर्गम बहिराम कोटक या गावाला मूलभूत सुविधा मिळण्याबाबत**

**(३) १९८२८ (१७-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेणच्या (जि.रायगड) खारेपाटातील दुर्गम बहिराम कोटक या गावासाठी गेल्या १०० वर्षापासून रस्ता, पाणी या मूलभूत सुविधा नसून या संदर्भात तेथील ग्रामस्थ वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांची लोकसंख्या सुमारे १५०० असून त्यांना नेहमीची पाण्याकरिता वणवण करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांकरीता रस्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. बहिराम कोटक या गावाची लोकसंख्या ६६५ इतकी असून पाणी पुरवठ्याची सुविधा उपलब्ध आहे तथापि, हे गाव शहापाडा उत्तर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील शेवटचे गाव असल्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. या गावाला टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो.

तसेच, बहिराम कोटक या गावास जोडणारा २ कि.मी. मुरमी रस्ता आहे.

(३) हेटवणे धरणातून शहापाडा धरणापर्यंत पाईपलाईनद्वारे पाणी आणण्याचे प्रस्तावित असून या योजनेत बहिराम कोटक या गावाचा समावेश आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण माणगाव यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

तसेच या गावापर्यंत २ कि.मी. रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथे विशेष बाब या सदराखाली २५१५ या लेखा शिर्षका अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) २२१६९ (१४-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर मतदार संघातील मौजा घुग्घुस येथे विशेष बाब या सदराखाली २५१५ या लेखा शिर्षका अंतर्गत रु.१ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ०९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने मौजा घुग्घुस येथे विशेष बाब या सदराखाली रु. १ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनानी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सदर निवेदनाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**कामशेत (ता.मावळ, जि.पुणे) येथील शेतीमध्ये गटाराचे सांडपाणी पाणी जात असल्याने जमिन नापीक होत असल्याबाबत**

**(५) २४२५५ (१४-०८-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामशेत (ता.मावळ, जि.पुणे) शहरातील गटारांचे सांडपाणी गावठाणातील सुमारे ६० शेतकऱ्यांच्या शेतात जात असल्याने ७० एकर जमिन नापीक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांनी याबाबत सन १९९४ पासून संबंधित अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रारी केल्या, परंतु यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील घाण पाणी शेतात जात असल्याने कोणतेही पीक घेता येत नसल्यामुळे, सर्व शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गटाराचे सांडपाणी शेतकऱ्यांच्या शेतात न जाण्याबाबत व या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे. गटाराच्या सांडपाण्यामुळे साधारणतः ३२ एकर जमीन बांधीत झाली आहे.
(२), (३), (४) व (५) सदर गावाचे सर्वेक्षण केले असता गावठाण हे डोंगराच्या पायथ्याला असल्याने डोंगराचे पाणी गावामध्ये येते. सदर गावाचा पर्यावरण विकास आराखडा तयार करण्यात आला असून ग्रामसभेच्या मान्यतेने जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला आहे. जिल्हा परिषद स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयात शेततळ्यांचे काम करण्याबाबत**

**(६) २८१८२ (१७-११-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या शेततळ्यांचे उद्दिष्ट गेली दोन वर्षे उस्मानाबाद जिल्हयात देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात सध्या विविध योजनांचे किती लाभार्थी शेततळ्यांच्या प्रतिक्षेत आहेत,
(३) असल्यास, सदर लाभार्थ्यांच्या शेततळ्यांची कामे करण्यासाठी व दुष्काळी पार्श्वभूमीवर शेततळ्यांची गरज लक्षात घेता सन २०१५-२०१६ मध्ये उद्दिष्ट देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-०८-२०१६) :** (१) होय.
उस्मानाबाद जिल्हयात विविध योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या शेततळ्याचे उद्दिष्ट सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षात देण्यात आले नाही. परंतु मग्रारोहयो अंतर्गत शेततळ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

(२) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सामुहिक शेततळ्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालयाकडे राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेंतर्गत ७६६ व मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत ३३५ असे एकूण ११०१ लाभार्थी प्रतिक्षेत आहेत.
(३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे १५१ इतका लक्षांक सन २०१५-१६ वर्षात प्राप्त झालेला असून त्यापैकी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत ३१ व राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत १२० इतका लक्षांक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील माणगांवसह ७४ ग्रामंपचायतींकडे गोळा झालेल्या कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत**

**(७) ३०२७५ (१६-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील माणगांवसह ७४ ग्रामंपचायतींकडे हजारो क्विंटल कचरा गोळा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माणगांवसह सर्वच ठिकाणी वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण व पर्यटन यामुळे लहान मोठ्या स्वरुपाचा कचरा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासंदर्भात तसेच डंपिंग ग्राऊंडची गरज ओळखून शासनाने ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) रायगड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ८१८ ग्रामपंचायतीपैकी शासनाच्या निकषांनुसार जिल्हास्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त ३८ ग्रामपंचायतीमध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाकरीता निधी वितरीत करुन कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरीत ग्रामपंचायतींना निधी वितरीत करण्यासाठी ग्रामपंचायत हागणदारीमुक्त असणे अनिवार्य आहे. सद्य:स्थितीत १४९ ग्रामपंचायतींना सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी सन २०१६-१७ च्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची भिस्त असलेल्या दारणा धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत**

**(८) ३१२८८ (२२-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची भिस्त असलेल्या दारणा धरणातून गेल्या काही दिवसात पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्याने या धरणातील पाणीसाठा निम्म्याहून कमी झाला आहे. त्यामुळे येत्या काळात धरणालगतच्या गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) जलशयातील पाणीसाठ्यास पिण्याकरिता आरक्षित ठेवण्याचे अधिकार शासन निर्णय दि.०७/०९/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी पिण्याच्या प्रयोजनार्थ पाणी आरक्षण केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २८१ शाळांपैकी अनेक शाळेमधील शिक्षक दीर्घकालीन रजेवर रहात असल्याबाबत**

**(९) ३१७२६ (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यात (जि.रायगड) जिल्हा परिषदेच्या एकूण २८१ शाळांपैकी अनेक शाळेमधील शिक्षक दीर्घकालीन रजेवर रहात असल्याची बाब माहितीच्या अधिकारात माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) होय ही बाब अंशत: खरी आहे. तथापि कर्जत तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २८१ शाळा आहेत. काही शाळामधील शिक्षक दिर्घकालीन रजेवर असल्याने सदर वर्गाचे शालेय व्यवस्थापन इतर शिक्षकांमार्फत चालविण्याचे नियोजन संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक / केंद्रप्रमुखामार्फत केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही.

---

**आदिवासी जिलह्यातील दीर्घ काळ कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या बदलीच्या नियमाबाबत**

**(१०) ३२७८८ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी जिल्ह्यात ३ वर्षे नोकरी केल्यानंतर प्राथम्याने आवडीच्या ठिकाणी बदली करावी, असा शासनाने यापूर्वीच निर्णय जाहिर केलेला असतानाही राज्यभरातील आंतर जिल्हा बदल्या प्रलंबित असून आदिवासी जिल्हयातील शिक्षकांच्या बदलीच्या बाबतीत सदरहू शासकीय निर्णयाचे जाणीवपूर्वक उल्लंघन झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षात बदलीचा नियम असतानाही १०-१० वर्षापासून सदरहू शिक्षक एकाच जिल्हयात कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्गमित केलेल्या सदरहू निर्णयाची आदिवासी जिल्ह्यातील वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या बदलीच्या संदर्भात सदरहू नियमाची अंमलबजावणी न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) व (२) नाही.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा बदल्या या शासन परिपत्रक क्र. जिपब ०७११/प्र.क्र.११३/११/ आस्था १४, दि. २९-९-२०११ व वेळोवेळी निर्गमित केलल्या शुध्दीपत्रकान्वये विहीत केलेल्या तरतूदीनुसार केल्या जातात. आंतरजिल्हा बदल्या या प्रवर्गनिहाय, सवंर्गनिहाय व ज्येष्ठतेनुसार केल्या जातात. आदिवासी क्षेत्रात ३ वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यास आंतरजिल्हा बदली करताना कोणतेही प्राथम्य नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाड्यातील आष्टी उपसा सिंचन योजनेचे (६ टीएमसी) काम अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे वर्ग करण्याबाबत**

**(११) ३३०२२ (१५-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा-मराठवाडा (२५ टीएमसी) योजनेअंतर्ग मराठवाड्यातील आष्टी उपसा सिंचन योजनेचे (६ टीएमसी) काम अधिक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे असून सदरहू योजनेचे काम तातडीने मार्गी लागण्यासाठी अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे वर्ग करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू योजनेचे काम अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद याच्यांकडे वर्ग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत संबंधित गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा प्रस्ताव त्यांचे दिनांक १५.१२.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून शासनाचे विचाराधीन आहे.

(३) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र.३ (आष्टी) या योजनेस पर्यावरण मान्यता नसल्यामुळे व अपुऱ्या निधीमुळे विलंब होत आहे.

---

**मावळ तालुक्यातील जवळपास २५ ते ३० गावे मोबाईल नेटवर्क विना असल्याबाबत**

**(१२) ३३२४२ (२०-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील जवळपास २५ ते ३० गावे मोबाईल नेटवर्क विना असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तातडीच्या व इतर प्रसंगी गावी परगावी संपर्क साधायचा झाल्यास तेथील ग्रामस्थांना सुमारे १५ किमी अंतरावर जावे लागते परंतु तेथे ही एखाद्याच कंपनीचे नेटवर्क सुरु असते बाकी सर्व बंद असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मावळातील अनेक जण नोकरी व्यवसायानिमित्त पुणे-मुंबईत स्थायिक झाले असल्याने त्यांना त्यांच्या गावी पालकांशी-नातेवाईकांशी संपर्क करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्यस्थितीत या मावळ तालुक्यातील जवळपास २५ ते ३० गावांमध्ये मोबाईल नेटवर्क उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) पुणे जिल्ह्यातील ९ तालुके डोंगरी क्षेत्रात असून त्यापैकी ७ तालुक्यांचा सुमारे ३० ते ४० टक्के भाग हा सह्याद्री पर्वतीय क्षेत्रात येत असून सदर ठिकाणी मोबाईल नेटवर्कची अडचण आहे. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदरची बाब ही Telecom Regulatory Authority of India (TRAI) / माहिती व नभोवाणी भारत सरकार, नवी दिल्ली यांचेशी निगडीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेडीभोकरी व भोकर (ता.चोपडा, जि.जळगांव) या दोन गावांच्या दरम्यान कायम स्वरुपी पुल बांधण्याबाबत**

**(१३) ३५४७० (२०-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेडीभोकरी व भोकर (ता.चोपडा, जि.जळगांव) या दोन गावांच्या दरम्यान दरवर्षी हंगामी पूल टाकला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन तालुक्यांना जोडणाऱ्या पुलाचे कायम स्वरुपी बांधकाम करण्याचे शासनाचे विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०७-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) पुलाचे संकल्पन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील ४३ सिंचन प्रकल्प मान्यतेविना प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ३६१३२ (१२-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील ४३ सिंचन प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेविना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागातील राज्यातील ३१ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे व त्यात लघुपाटबंधारे प्रकल्प साठवण तलाव आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांना प्राधान्य देण्यात आले आहे परंतु मोठे व मध्यम प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भातील ४३ सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीस मान्यता देण्यात विलंब का होत आहे,
(४) असल्यास, विदर्भातील ४३ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यातील ३१ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यामध्ये लघु व मध्यम प्रकल्पांचा समावेश आहे.
(३) विलंब होत नाही.
(४) सुप्रमा मान्यतेसाठी गती देण्यासाठी शासन निर्णय दि.०९.०९.२०१५ अन्वये विदर्भ व मराठवाडा प्रदेशातील सुप्रमा प्रदान करण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. तसेच प्रकल्पांचे काम खोळंबू नये म्हणून काही प्रकल्पांना सन २०१५-१६ च्या मंजूर तरतुदींचे मार्यदेत मंजूर प्रमा / सुप्रमा किंमतीपेक्षा प्रकल्पांवर जादा खर्च करण्यास काही अटींच्या अधीन राहून परवानगी दिल्याने प्रकल्पांची कामे प्रगतीत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वटफळ (ता.जि.वाशिम) येथे दलितवस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१५) ३६१६६ (१६-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वटफळ (ता.जि.वाशिम) येथे दलितवस्तीची कामे, अंगणवाडी शौचालय, तांडा वस्तीमध्ये कॉंक्रीट रस्त्यांची कामे प्रलंबित असून निकृष्ट दर्जाची झाली असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ व १५ सप्टेंबर, २०१५ रोजी लेखी तक्रार ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी व पंचायत समिती, गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कामाची गुणवत्ता तसेच त्यांना पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन व पंचायत समितीमार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा समाजकल्याण अधिकारी वाशिम व उप विभागीय अभियंता कारंजा यांनी संयुक्तपणे दलित वस्तीमध्ये झालेल्या कामांची पाहणी केली असून सदर कामे सुस्थितीत आहे. तक्रारीमध्ये कुठल्याही प्रकारचे तथ्य आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हातोली (ता.मानोरा, जि.वाशीम) ग्रामपंचायतीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१६) ३६१७० (१४-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातोली (ता.मानोरा, जि.वाशीम) ग्रामपंचायत सचिव, श्री.उमरे यांनी त्यांच्या कार्यकाळात लाखो रुपयांचा गैरव्यवहार करुन कामे केलीच नाहीत, असा आरोप ग्रामपंचायत सदस्य यांनी एका लेखी तक्रारीद्वारे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गट विकास अधिकारी, मानोरा व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १३/१०/२०१५ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती मानोरा यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अंती विविध योजनांच्या खर्चामध्ये रु. १५०७९०/- इतक्या रकमेची अनियमितता आढळून आली आहे.
(३) व (४) गटविकास अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार खर्चाच्या अनियमिततेबाबत ग्रामपंचायत सरपंच व सचिव दोषी आढळून आल्यानुसार ग्राम पंचायती सरपंच सौ.व्हि.सी.होलगरे यांचे विरुध्द महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ग) नुसार कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.
तसेच ग्रामपंचायत सचिव कु. आर.डी.उमरे यांचे विरुध्द महाराष्ट्र जि.प.सेवा शिस्त व अपील नियम १९६४ चे कलम ३ (१) नुसार निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची कामे बंद असतानाही बनावट हजेरी पटाद्वारे कंत्राटदाराने केलेला गैरव्यवहार**

**(१७) ३८२७२ (२०-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. हासेगांव (शि.) (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे मागील दोन वर्षापासुन महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे बंद असतांना देखील, बनावट हजेरी पत्रकाच्या साहाय्याने संबंधित कंत्राटदाराने ६० लक्ष रुपयांचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जुन्याच कामांना नवीन कामे दाखवुन मजुरांच्या बनावट सह्या व अंगठे करुन कामाचा मागणी अर्ज व हजेरीपट दाखल करुन रक्कम घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाणेकरवाडी (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायतीस कचरा टाकण्यास जागा उपलब्ध नसल्याबाबत**

**(१८) ४०२३५ (०४-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाणेकरवाडी (ता.खेड, जि.पुणे) गावात ३५,००० लोकसंख्या असून ग्रामपंचायतीस कचरा टाकण्यास जागा उपलब्ध नसल्याने परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने ग्रामपंचायतीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी गट विकास अधिकारी, खेड यांस कचऱ्याच्या नियोजनाबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) ग्रा.प. नाणेकरवाडी ता.खेड, जि.पुणे येथील लोकसंख्या जनगणना २०११ नुसार १२६५४ इतकी आहे. कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सदर ग्रामपंचायत क्षेत्रात गायरान अथवा शासकीय जागा उपलब्ध नाही. सदर परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन माहे जाने, २०१६ वा त्या दरम्यान आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. खबरदारीची उपाययोजना म्हणून ग्रामपंचायती मार्फत सदर परिसरात धुरळणी, फवारणी करण्यात येऊन जागोजागी बी.एस.सी. पावडरचा वापर करण्यात आला होता. साथरोग, जलजन्य आजार होऊ नये म्हणून भित्ती पत्रके, जाहीरात पत्रके, दवंडी या माध्यमार्फत जनजागृती करण्यात आली.
(२) होय.

(३) कचरा नियोजनाबाबत जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायतीने मा.उपविभागीय अधिकारी खेड मा.तहसीलदार खेड यांना देखील सदर निवेदन सादर केले होते. कचरा व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण करणेसाठी खाजगी जागा खरेदी खताने उपलब्ध करुन घेणे बाबत ग्रामपंचायतीला पंचायत समिती मार्फत कळविण्यात आले आहे.
(४) सद्य:स्थितीत गंगोत्री ईनर्जी प्रोजेक्ट प्रा.लि.पुणे मार्फत ग्रामपंचायत नोणकरवाडीसह परिसरातील एकूण ८ ग्रामपंचायतीसाठी चाकण परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेत जागा मागणीसह घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रस्तावित आहे.

---

**सोलापुर जिल्ह्यात गौण खनिज अनुदानाचा गैरवापर करणाऱ्या २३९ ग्रामपंचायती दोषी आढळल्याबाबत**

**(१९) ४०२३९ (०४-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्थिक वर्ष २०१३-१४ ला सोलापूर जिल्ह्यातील ८२१ ग्रामपंचायतींना ७६ कोटी २६ लाख ८५ हजार रुपयांचा गौण खनिज निधी प्राप्त झाला होता, सदर निधीचा वापर योग्य होत नसल्याचे तक्रारी प्राप्त झाल्याने ८२१ पैकी ३३५ ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात आली त्यात २३९ ग्रामपंचायती दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर ग्रामपंचायतींनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेशिवाय खर्च केल्याचे, खरेदी करताना वित्तीय नियमांचा अवलंब न केल्याचे, महाराष्ट्र ग्रामपंचायती लेखा संहिता अधिनियम, २०११ नुसार दफ्तर अध्ययावत न ठेवल्याचे, खर्च करताना रोख व सेल्फ रक्कम दिल्याचे, कॅशबुक व प्रमाणके अध्ययावत नसल्याचे व मुल्यांकनापेक्षा जास्त खर्च केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित ग्रामपंचायतींवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) ग्रामपंचायतींच्या दोषी ग्रामसेवकांवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम-१९६४ मधील नियम क्र. ४ मधील तरतूदीनुसार व कार्यरत दोषी सरपंचाविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ कलम ३९ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोडी पाटील (जि.अहमदनगर) यामोठया लोकसंख्येच्या गावासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत**

**(२०) ४०५३५ (०४-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोंडी पाटील (जि.अहमदनगर) यामोठया लोकसंख्येच्या गावासाठी कायमस्वरुपी व पूर्णवेळ ग्रामविकास अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत तेथील ग्रामस्थानी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिंचोडी पाटील यांना लेखी निवेदन दिले असल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावासाठी पूर्णवेळ ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचा आदेश क्रमांक आस्था-२/९४४/१५, दिनांक १०.१२.२०१५ अन्वये चिंचोडी पाटील, ता.नगर या ठिकाणी ग्रामविकास अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोकुळवाडा (ता.सुधागड, जि.रायगड) गावात मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२१) ४०८६६ (०४-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुळवाडा (ता.सुधागड, जि.रायगड) गावात मोठ्याप्रमाणात असलेल्या धनगर समाज रस्ता, पाणी, वीज अशा अनेक मुलभूत सुविधा व शासकीय योजनेपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यांची दुरवस्था झाली असून दळण वळण करण्यासाठी कोणतेच साधन उपलब्ध नसल्यामुळे वयोवृध्द व गरोदर महिलांना उपचाराकरिता डॉक्टरांकडे नेण्यासाठी ग्रामस्थांना डोलीतून घेऊन जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उक्त विभाग अनेक शासकीय योजना व मुलभूत सुविधांपासून वंचित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

गोकुळवाडा ही वाडी ग्रामपंचायत पाच्छापूर अंतर्गत आहे. सदर वाडीमध्ये धनगर समाजाची २८ कुटूंबे असून १५० इतकी लोकसंख्या आहे. सदर वाडीच्या रस्त्यासाठी सन २०११-१२ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत ०.३० कि.मी. चे माती काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायतीने १३ वा वित्त आयोग अनुदानातून सन २०१५-१६ मध्ये माती भराव व खडीकरणाचे काम केलेले असून डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत रु. ५.०० लक्ष चे रस्त्याचे काम निविदा स्तरावर आहे. सदर वाडीमध्ये सद्य:स्थितीत दोन हातपंत तसेच दोन विहीरी आहेत. सदर वाडीमध्ये वीज व्यवस्था असून ग्रामपंचायतीमार्फत दोन सौरदिप बसविण्यात आलेले आहेत. इंदिरा आवास योजनेंतर्गत दोन लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत सदर वाडीमध्ये १० लाभार्थींना शौचालयाचा लाभ देण्यात आला आहे. तसेच इयत्ता १ ते ४ थी पर्यंत प्राथमिक शाळा आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील खडकसांगवा गावाजवळ**
**बेंबळा प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२२) ४०९०२ (०५-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील खडकसांगवा गावाजवळ बेंबळा प्रकल्प पूर्ण होवून ७ वर्षे झाली असतानाही आजमितीस सुमारे २ हजार ६०० कोटी रूपये खर्च होवून निर्माण झालेल्या या प्रकल्पांच्या कालव्यातून आणि उपसा सिंचन कालव्यातून केवळ ८ हजार हेक्टर एवढयाच सिंचनाची सोय झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बेंबळा प्रकल्पामुळे ४७ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचनाचे लक्ष ठेवण्यात आले असतानाही केवळ ८ हजार हेक्टर एवढेच सिंचन झाले असल्याने १९२ गावांमधील शेतकरी सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेंबळा प्रकल्पासाठी पहिली मान्यता ६२२ कोटीची मिळालेली असून प्रकल्पांच्या कामास झालेल्या विलंबामुळे प्रकल्प आता तर ३ हजार ४०० कोटीवर पोहचला असतानाही अद्यापी प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ११३ किलोमीटर पर्यंत पाणी पोहचविण्याचे बेंबळा प्रकल्प पूर्ण होण्यास आणखी किती वेळ लागेल व प्रकल्पाच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच
मागील ७ वर्षांमध्ये लक्षाच्या आसपासही हा प्रकल्प पोहचलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकल्पाद्वारे ४७ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचन पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०८-२०१६) :** (१) नाही.

प्रकल्पाच्या धरणाचे काम पुर्ण झालेले असून कालवे व वितरण प्रणाली, भाग-१ ची कामे प्रगतीपथावर आहे. प्रकल्पीय सिंचन क्षमता ५३९६८ हेक्टर असून प्रकल्पापासून सद्य:स्थितीत ३९२९८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच प्रत्यक्ष मागणीनुसार सन २०१५-१६ मध्ये ६०४० हे. प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.

(२) नाही.

(३) प्रकल्पाची तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२१७६.२८ (दरसूची २००८-०९) कोटी असून प्रस्तावित चतूर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ३९०१.१६ कोटी एवढी आहे. उपरोक्त वाढ प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे झालेला विलंब, दरसूचीतील वाढ, न्यायालयीन निर्णयानुसार भूसंपादन मोबदल्यात झालेली वाढ, आवश्यक अभियांत्रिकी बदल इ. बाबीमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झालेली आहे. प्रकल्प प्रगतावस्थेत असून धरण १००% मुख्य कालवा ९७%, वितरीका लघु पाट ७०% भाग - १ ची कामे ३०% पूर्ण झालेली आहेत.

(४) प्रकल्पग्रस्तांचा विरोध, भूसंपदनासाठी व पुनर्वसनाचे प्रश्न व नियोजनाप्रमाणे निधी उपलब्ध न झाल्याने विलंब झालेला आहे.

(५) निधी उपलब्धतेनुसार प्रकल्प जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात होत असलेली दिरंगाई**

**(२३) ४१२६२ (०४-०५-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील मग्रारोहयो कामात अनास्था दाखविल्याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हयातील गटविकास अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार आदि दर्जाच्या अधिकाऱ्यांना दंड लावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दंडाची वसूली करण्यात आली आहे काय,

(३) तसेच या दंडाशिवाय अन्य कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (११-११-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत हजेरीपत्रक बंद झाल्यापासून १५ दिवसाच्या आत मजूरीचे प्रदान करण्यात आले नाही तर मजूरी प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी १६ व्या दिवसापासून प्रती दिवस देय मजुरीवर ०.०५% नुकसान भरपाई (विलंब शुल्क) देण्याचा व सदर रक्कम विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून वसूल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या प्रकरणी नांदेड जिल्यातील मजूरी प्रदानास व हजेरीपत्रक अदा करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व

कर्मचाऱ्यांवर रू.५,८२,१२८/- इतकी विलंब शुल्काची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी रू.३,२९,५५६/- इतक्या विलंब शुल्काची रकमेची वसूली करण्यात आली आहे. तसेच, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाअंतर्गत रू.१७,२७०/- इतका दंड आकारला असून त्यापैकी रू.१०,२७०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इसापूर धरण (जि.हिंगोली) क्षेत्राखाली गेलेल्या शेतकऱ्यांची बागायती शेतात असलेला ऊस पाण्याअभावी वाळत असल्याबाबत**

**(२४) ४१३४१ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील इसापूर धरण क्षेत्राखाली गेलेल्या शेतकऱ्यांची बागायती शेती धोक्यात आली असून शेतात असलेला ऊस पाण्याअभावी वाळत असल्याने या भागातील शेतकऱ्यांनी धरणातून पाणी उपसा करण्याची मागणी जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेकडे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणग्रस्तांच्या मागणीवरुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत असलेल्या ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२५) ४१४६६ (१७-०५-२०१६). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती खामगाव (जि.बुलडाणा) अंतर्गत असलेल्या ग्राम सेवकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जागा रिक्त असल्यामुळे एका ग्राम सेवकाला ३-३ गावाचा अतिरिक्त भार देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एका ग्रामसेवकाला अतिरिक्त भार दिल्यामुळे त्यांच्या मूळ गावाची विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची बँकाचे कर्ज काढण्याकरिता शासनाचे व इतर दाखले मिळण्यासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामसेवकाच्या परीक्षा पूर्ण होऊनसुद्धा त्यांना नियुक्त्या दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ग्रामसेवकाच्या नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पंचायत समिती खामगांव मध्ये ग्रामसेवक या संवर्गात ३ पदे रिक्त असल्यामुळे ३ ग्रामसेवकांकडे एक अतिरिक्त ग्रामपंचायतचा प्रभार देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

शेतकऱ्यांना बँकांचे कर्ज काढण्यासाठी इतर दाखले देणे ही बाब महसूल विभागाशी संबंधित असून ग्रामसेवकाकडून इतर महत्वाचे दाखले मिळण्यासाठी त्रास होत असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) हे खरे नाही.

दि.०९.११.२०१४ रोजी कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेमधून पंचायत समिती खमगांव येथे ५ कंत्राटी ग्रामसेवक यांना नियुक्त्या दिल्या आहेत. दि.०२.१२.२०१५ रोजी जिल्ह्यांतर्गत कंत्राटी ग्रामसेवकांच्या रिक्त पदासाठी घेतलेल्या परीक्षेमधून नियुक्ती दिलेल्या ग्रामसेवकामधून ४ कंत्राटी ग्रामसेवकांना पंचायत समिती खामगांव येथे पदस्थापना देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिल्हा परिषद बुलढाण्याचे बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभागीय कार्यालय खामगाव येथे उभारण्याबाबत

**(२६) ४१४७४ (१७-०५-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या विविध योजनेचा व्याप लक्षात घेता खामगाव येथे अतिरिक्त जिल्हा परिषद बांधकाम विभाग सुरु करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०९ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रानुसार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प बुलढाणा यांचा याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ३१३८ दिनांक ७ सप्टेंबर, २०१४ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे खामगाव येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभाग खामगाव येथे सुरु करण्यात आल्यास घाटाखालील ६ तालुक्यातील प्रलंबित कामांना वेग मिळेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा परिषदांच्या प्राप्त प्रस्तावांचा आढावा पूर्ण करण्यात आला असून पद निर्मितीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलडाणा) येथे मुलभूत सुविधे अंतर्गत विशेष निधीतून झालेल्या कामांची देयके देण्यासाठी उर्वरित निधीची रक्कम देण्याबाबत

**(२७) ४२०६६ (३०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलडाणा) येथे सन २०१३-१४ मध्ये मुलभूत सुविधे अंतर्गत (२५-१५) विशेष निधीतून झालेले कामांचे देयके देण्यासाठी शासनाकडे बाकी असलेली २० टक्के निधीची रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रावर निर्णय घेऊन येथे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये राज्यात मंजूर करण्यात आलेल्या मुलभूत सुविधांच्या कामावरील २०% प्रमाणे रु.९२.२३ कोटी इतका निधी उपलब्ध करुन द्यावयाचा होता. त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये रु.७.५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून उर्वरित रु. ८४.७६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी माहे जुलै २०१६ च्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि, नियोजन विभागाने सदर

प्रस्ताव नाकारल्यामुळे सन २०१६-१७ च्या मंजूर तरतूदीमधून निधी उपलब्ध करुन देणेसाठी शासनाच्या मान्यतेकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. प्रस्ताव मान्य झाल्यास निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील एकरुख**
**उपसा सिंचन योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ४२२१२ (३०-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यासाठी एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी १६ कोटी ७१ लाखांच्या खर्चाला जलसंपदा सचिवांनी परवानगी दिली,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील एकरुख उपसा सिंचन योजनेतील प्रलंबित कामे त्वरीत पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०९-२०१६) :** (१) होय. सन २०१४-१५ च्या अखर्चित आर्थिक तरतुदीच्या व सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पिय तरतुदींच्या मर्यादेत सु.प्र.मा पेक्षा वाढिव खर्चाला शासनाने मान्यता दिली आहे.
(२) आर्थोपायाच्या स्थितीनुसार सन २०१६-१६ मध्ये या योजनेसाठी रु. २०.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागात शहरांप्रमाणे सोयी-सुविधा पुरविण्यासाठी श्यामाप्रसाद**
**मुखर्जी रुरबन अभियान योजना राबविण्याबाबत**

**(२९) ४२४७२ (०३-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील गाव समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करण्यासह त्यांना शहरांप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाची श्यामाप्रसाद मुखर्जी रुरबन अभियान योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ५ जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत सन २०१६-१७ या वर्षासाठी शासनाने प्रस्तावित केलेल्या योजेनेचा लाभ घेण्यासाठी व त्याच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे व यासाठी किती निधीची आवश्यकता असून या अभियांनाअतंर्गत राज्यातील कोणत्या जिल्हयाच्या किती तालुक्यांचा समावेश करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर योजना तातडीने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) होय.
(२) रुरबन अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गाव समुहांचा विकासासाठीचा सर्व निधी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनेतून एककेंद्राभिमूखता (Convergence) द्वारे प्राप्त होणार आहे. तसेच याशिवाय आवश्यतेप्रमाणे विविध प्रकल्पांवर केंद्र शासनाच्या "उणीवा निवारण निधी" (Critical Gap Funding) मधून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.
केंद्र शासनाने खालील गाव समुहांच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **उप विभाग** | **गाव समुहाचे नाव** |
|---|---|---|---|
| | | बिगर आदिवासी क्लस्टर्स | |
| १ | बीड | परळी | शिरसाल |
| २ | बुलढाणा | लोणार | सुलतानपूर |
| ३ | पुणे | हवेली | लोणी काळभोर |
| ४ | जालना | परतूर | आष्टी |
| ५ | औरंगाबाद | गंगापूर | जोगेश्वरी |
| ६ | नागपूर | कामठी | वडोदा |
| | | आदिवासी क्लस्टर्स | |
| ७ | जळगांव | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर |

(३) सदरची योजना तातडीने राबविण्यासाठी नियोजन म्हणून सिडको (CIDCO) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## करा‍ड तालुक्यातील सरपंच समितीच्या बैठका आयोजित करण्याबाबत

**(३०) ४२५५० (३०-०४-२०१६). श्री.पृथवीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड तालुक्यातील ४० गावांची सरपंच समितीची गेल्या अनेक महिन्यांपासून बैठक न झाल्याने पाणाच्या, समस्या विकास आराखडा यासारखे अनेक महत्वाचे प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच समितीच्या बैठका वेळेवर घेऊन रहिवाश्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम ७७ क (२) नुसार पंचायत समितीचे उपसभापती हे सरपंच समितीचे पदसिध्द सभापती आहेत. कराड पंचायत समिती येथे सरपंच समितीच्या सभा नियमित घेतल्या जातात. माहे मे, २०१५ पासून उपसभापती हे आजारपणाच्या कारणास्तव रजेवर असल्याने तसेच जून ते ऑगस्ट २०१५ या कालावधीत १०४ ग्रामपंचायतीच्या निवडणूक आचारसंहितेमुळे सरपंच समितीच्या सभा झालेल्या नाहीत. मार्च २०१६ पासून संरपंच समितीच्या सभा मा.सभापती यांच्या अध्यक्षतेखाली नियमित सुरु आहेत. दरम्यान रहिवाश्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषद गट स्तरावर प्रभाग समितीच्या सभेत, तालुका स्तरावर टंचाई आढावा सभेत तसेच ग्रामसेवक यांच्या मासिक आढावा सभेमध्ये गाव स्तरावरील समस्या सोडविण्याबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे.

---

### हिंगोली जिल्ह्यातील ३६९ ग्रामपंचायतींनी एकही काम सुरु केले नसल्याने जिल्ह्यातील सिंचनाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ४२९६५ (२९-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील विविध योजनाप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील सक्रिय मुजरांच्या आधार संलग्नीकरणाचे काम मंद गतीने होत असून ५४ टक्क्यांच्यावर हे काम होत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक वर्षात तब्बल ३६९ ग्रामपंचायतींनी एकही काम सुरु केले नसल्याने जिल्ह्यातील सिंचनाची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सिंचनाची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) नाही. जिल्ह्यात एकूण ३४६ ग्राम पंचायतीमध्ये कामे शेल्फवर असून, मागणी अभावी सुरु करता आलेली नाहीत. उर्वरित २१७ ग्रामपंचायतींमध्ये कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) सद्यस्थितीत हिंगोली जिल्ह्यात एकूण १५३० सिंचन विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. तसेच, उर्वरित ५१९ सिंचख्न विहिरींची कामे, शेततळे, सिमेंट बंधारे इ. सिंचनाची कामे पूर्ण करण्याचेही निदेश संबंधित गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची उपलब्धता असूनही जिल्हा परिषदेची विकासकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) ४३२०७ (३०-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची उपलब्धता असूनही जिल्हा परिषदेच्या विकासकामांवर निधी खर्च न केल्यामुळे विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य शिक्षण, अंगणवाडी बांधकाम व ग्रामपंचायत तसेच इमारत व दळणवळण या विभागांकडून करण्यात येणाऱ्या कामांची अंदाजपत्रकेच तयार नसणे, तर काही कामांना प्रशासकीय मान्यताही देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ मध्ये ज्या कामांना निधी उपलब्ध झाला आहे त्या कामांना प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व तद्नंतरची निविदा यांस नियोजन करुन मंजूरी घेण्याच्या प्रक्रियेमध्ये काही प्रमाणात विलंब झाला असून माहे जानेवारी २०१६ अखेर विकास कामांवर २६% खर्च झालेला होता. तथापि, कामाचे नियोजन करुन मार्च २०१६ अखेर ४८% निधी खर्च झाला आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/ अर्थोपाय, दि.०६ जून, २००८ नुसार पुढील आर्थिक वर्षात निधी खर्च करण्याची परवानगी आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी उर्वरीत निधीचे नियोजन करुन सर्व खर्च मार्च, २०१७ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

आरोग्य शिक्षण, अंगणवाडी, ग्रामपंचायत तसेच इमारत व दळणवळण बांधकाम क्रमांक १, २ व ३ या विभागांनी मार्च, २०१६ अखेर कामाचे नियोजन करुन सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मान्यता घेतल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेमार्फत गावात बसविलेले बहुतांश सौर दिवे बंद पडल्याबाबत**

**(३३) ४३३२५ (३०-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेमार्फत गावागावात बसविलेले बहुतांश सौर दिवे बंद पडले असून या योजनेसाठी खर्च केलेले कोटयवधी रुपये वाया गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेमार्फत बसविण्यात आलेल्या सौर दिव्यांच्या दुरुस्तीसाठीची यंत्रणा जिल्हा परिषदेकडे नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवीदा प्रक्रीयेमध्ये तीन वर्षे दुरुस्तीची अट असुन दहा टक्के रक्कम त्यासाठी राखुन ठेवता येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांनी सौर दिव्याची दहा टक्के राखीव रक्कम तातडीने ठेकेदारांना परत केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बंद सौर दिवे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) होय.

(४) नाही.

शासन निर्णयानुसार कार्यारंभ आदेश दिलेल्या ठेकेदाराची दहा टक्के बँक गॅरंटीची रक्कम राखून ठेवून संकीर्ण अनामत या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात आलेली आहे.

(५) संबंधित ठेकेदारास कार्यारंभ आदेशानुसार तालुकानिहाय तपासणी करुन बंद असलेल्या सौरपथ दिवे चालू स्थितीत करणेकामी कळविण्यात आलेले आहे.

---

**ठाणे येथील गाळेधारकांना ठाण्यातील जिल्हा परिषदेच्या आवारात मालकी तत्वावर गाळ देण्याबाबत**

**(३४) ४४५१३ (२१-०४-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराच्या पुर्नविकासाच्या वेळी सन १९९८ पासून बाधीत झालेल्या ५३ व्यावसायिकांना जिल्हा परिषद, ठाणे आवारात गाळे बांधून सामावून घेण्यासाठी महापालिकेने जिल्हा परिषद, ठाणे यांना ८२०० सेक्वरफुटाचा भुखंड हस्तांतरित केला होता, हे खरे आहे काय,

(२) सदर दुकाने बांधण्याकरिता गाळेधारकांनी प्रत्येकी १ लाख ८७ हजार रुपयाचा भरणा जिल्हा परिषद कार्यालयात केला होता व त्याबदल्यात ५ x ६ आकाराचे गाळे देण्याचे जिल्हा परिषदेने मान्य केले होते परंतु उक्त गाळेधारकांना अद्यापही मालकी हक्क देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त गाळे धारकांना मालकी तत्वावर गाळे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेने जिल्हा परिषद ठाणे यांच्या मालकीची ५५६४ चौ.फुट जागा संपादित करुन त्याऐवजी त्यांनी ८१२५ स्के. फुटाचा भूखंड जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केलेला आहे.

(२) ठाणे जिल्हा परिषद सर्वाधारण सभा २३/९/१९९८ ठराव क्र.२१३ अन्वये रस्ता रुंदी करणामुळे विस्तापित होणाऱ्या दुकानदारांना जिल्हा परिषदेच्या आवारात सामावून घेणेबाबत मान्यता दिली आहे. अशा ५३ गाळेधारकांना ५x६ आकाराचे ५३ गाळे भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव ठाणे जिल्हा परिषदेने मान्य केला आहे.

शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांनी त्यांचे पत्र क्र. जिपठा/१०९९/सीआर-१३२/२६ दि.२५/५/१९९९ या निर्णयातील अटी व शर्तीनुसार सदर गाळे बांधण्याकरीता विस्तापित गाळेधारकांनी प्रत्येकी रु.१ लाख ८७ हजार इतकी रक्कम अनामत म्हणून जिल्हा परिषदेकडे भरणा केला आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार ज्या भाडेकरुंना नविन भाडे व करारातील अटी व शर्ती मान्य होणार नाहित त्या भाडेकरुंना अनामत रक्कम परत करण्यात येते आणि रिक्त झालेला गाळा नव्याने भाडेतत्वावर देण्याबाबत जिल्हा परिषद, ठाणे यांनी दिनांक ४/१/२०१२ व १२/७/२०१२ रोजी ठराव क्र.३८ पारित केलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(३५) ४५०१० (०३-०५-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करुन देण्यास विलंब केल्याचा आरोप अधिकाऱ्यांवर असून अनेक ठिकाणी मजुरांची बनावट नावे दाखवून देयक घेतल्याचा प्रकारही घडला आहे, एका गावात फक्त पाच तर मर्जीतल्या गांवात ४० ते ५० विहीरी असा प्रकार घडला आहे, मग्रारोहयोच्या कामात दुर्लक्ष केल्याने नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनी यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर दंड लावण्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच नांदेड जिल्ह्यातील मग्रोरोहयो अंतर्गत झालेल्या कामातील गैरव्यवहार निदर्शनास आल्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यासह अनेकाविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिकारी वर्ग गुन्हाच्या भीतीने मजुरांच्या नोंदी घेण्यात तयार होत नसल्याने जिल्ह्यातील मजुरांच्या हाताला काम मिळत नसल्याने मंजूर स्थालांतर करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मजूरांना काम मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

नांदेड जिल्ह्यात मग्रारोहयो अंतर्गत मजुरांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना वेळेवर काम उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणात विहीरी मंजूर झाल्या आहेत.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मजुरांना मजुरीची अदायगी १५ दिवसाच्या आता अदा न केल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी सर्व तहसिलदार व गटविकास अधिकारी यांना विलंब शुल्कापोटी रु.१,१७,३३४/- इतका दंड आकारला आहे.

(२) हे खरे आहे.

नांदेड जिल्ह्यात मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत ७ तालुक्यातील ३८ ग्रामपंचायतीमध्ये अनेक अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द मा.न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हे दाखल झाले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यात मजुरांनी कामाची मागणी केल्यानंतर त्यांना वेळेवर काम उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच शेल्फवर पुरेशी कामे मंजूर करुन ठेवण्यात आलेली आहेत.

सध्या नांदेड जिल्ह्यात ९४७ कामे सुरु असून त्यावर १५,४६८ मजूर उपस्थित आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या निधीतून सुरु असलेल्या राजीव गांधी ग्रामभवनाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(३६) ४५१९१ (२१-०४-२०१६). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोली रुपराव (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे नुकतेच जिल्हा परिषदेकडून २ लाख ४० हजार रुपये अंदाजित खर्च असलेल्या राजीव गांधी ग्रामभवनाच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकामाच्या पायाभरणीमध्येच संबंधित ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन इमारतीचा एकही कॉलम हा लांबी, रुंदी व गुण्यात न घेता मागे-पुढे करुन कच्चा माल वापरुन बांधकाम अभियंत्यांच्या सूचना डावलून बांधकाम सुरुच ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

अभियत्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तात्काळ सुधारणा करण्यात आली आहे.

(३) सदरचे काम हे ग्रामपंचायत स्वत: करत होते. तथापि नंतर ई-टेंडर करुन काम पूर्ण करण्यात आले.

(४) विलंब झालेला नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कर्नाटक सिमेलगत वसलेल्या गणेशवाडी गावाला सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(३७) ४५३८४ (३०-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कर्नाटक सिमेलगत वसलेल्या गणेशवाडी गाव शासकीय सोयी सुविधांपासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत सदर गावाची पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासकीय सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मौजे राजगोळी खुर्द ग्रामपंचायती अंतर्गत गणेशवाडी ही २३७ लोकसंख्येची वाडी असून या वाडीमध्ये स्ट्रीट लाईट, अंगणवाडी इमारती, अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, इंदिरा आवास योजनेचा लाभ, इत्यादी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच नळ पाणीपुरवठा याजना मंजूर असून काम प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत ओलम ॲग्रो प्रा.लि. साखर कारखान्यामार्फत गावाला पाणी पुरवठा होत आहे.

---

## हिंगोली जिल्हयातील पाझर तलाव अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३८) ४५६२४ (३०-०४-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील जुन्या रोजगार हमी योजने मधून वगळण्यात आलेली आठ पाझर तलांवाची कामे १५ ते २० वर्षापासून अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण होऊन सुध्दा सदर पाझर तलावाची कामे अपूर्ण असण्याची सर्व साधारण कारणे काय आहेत व अपूर्ण पाझर तलावांची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील,

(३) असल्यास, सदरहू अपूर्ण पाझर तलावाची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी आठही पाझर तलावांची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. यापैकी सात पाझर तलावात मावेजा वाटप पूर्ण झाला असून फक्त शेगाव गाव तलावात संपादित होणाऱ्या जमिनीचा मावेजा अद्याप शेतकऱ्यांनी उचललेला नाही. त्यांच्या भुसंपादनास विरोध आहे.

(३) सदर तलाव ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे असल्याने ते पूर्ण करण्यासाठी जलसंपदा खात्याकडे निधी स्त्रोत उपलब्ध नाही. याकरीता जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. अन्य स्त्रोतातून निधी उपलब्ध झाल्यास सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीतील गावाच्या विकासाकरिता बीआरजीएफकडून मिळालेला निधी खर्च करण्यास मुदतवाढ देण्याबाबत

**(३९) ४६३७७ (०३-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेरावा वित्त आयोगाअंतर्गत जिल्हा परिषद चंद्रपूरला सन २०१४-२०१५ सत्रात बीआरजीएफ (मागास क्षेत्र अनुदान) अंतर्गत ९ कोटी ४० लाखांचा निधी प्राप्त झाला असून अधिकाऱ्यांच्या नियोजन शुन्यतेमुळे सदर निधी अखर्चित राहिला असल्यामुळे परत जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीतील गाव विकासाकरिता बीआरजीएफचा निधी मिळाला असून तो निधी अखर्चित असल्याने सदरचा निधी परत जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर निधी खर्च करण्यास मुदतवाढ देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

बीआरजीएफ अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात चंद्रपूर जिल्हयासाठी रु.२१०९.०० लक्ष प्राप्त झाला असून, त्यापैकी रु.१४६४.१६ लक्ष निधी खर्च झाला आहे. उर्वरित शिल्लक रक्कम रु. ६४४.८४ लक्ष अखर्चित आहे.
(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मागास क्षेत्र अनुदान निधी योजनेअंतर्गत घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीतील गाव विकासाकरिता रु. १७.४१ लक्ष इतका निधी मिळाला असून रु.१४.१३ लक्ष निधी खर्च झाला असून रु.३.२८ लक्ष निधी अखर्चित आहे.
(३) मंजूर आराखड्यामध्ये कामे शिल्लक नसल्यामुळे निधी अखर्चित आहे.
(४) सदर योजना दिनांक ३१ जुलै, २०१६ रोजी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून अखर्चित रक्कम केंद्र शासनाच्या निर्देशानुसार बँकेत भरणा करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील ग्रामस्थांना व अनुसूचित जाती, जमातीच्या कुटुंबीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(४०) ४६४०४ (२८-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक, आर्थिक जात सर्व्हेक्षण - २०११ अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील तब्बल ८८.६६ टक्के कुटुंबाचे उत्पन्न पाच हजार रुपयांच्या खाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सर्व्हेक्षणात चंद्रपूर जिल्हयातील अनुसूचित जाती, जमातीची तब्बल १ लाख ९० हजार ७८८ कुटुंबांचे मासिक उत्पन्न पाच हजार रुपयांच्या आत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील ग्रामीण भागात केवळ ३.४४ टक्के लोकांनी पदवी किंवा त्याहून अधिक शिक्षण घेतले असून ग्रामीण भागात अद्यापही २७ टक्के लोक निरक्षर आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील ग्रामस्थांना व अनुसूचित जाती, जमातीच्या कुटुंबीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०९-२०१६) :** (१), (२) व (३) सचिव, केंद्रीय ग्रामीण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक ३०.५.२०११ च्या पत्रास अनुसरुन, राज्यात ऑक्टोंबर-२०११ पासून सामाजिक, आर्थिक व जात निहाय सर्वेक्षण कार्यक्रम-२०११ राबविण्यात आला.

सदर कार्यक्रमानुसार चंद्रपूर जिल्ह्यात देखील असा सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबांची माहिती संगणकीय प्रणालीने नोंदवून त्यानुसार प्रारुप याद्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

केंद्रीय ग्रामीण मंत्रालयातर्फे, या कार्यक्रमांतर्गत प्राप्त माहितीचे संस्करण व पृथक्करण केल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ दिला जातो. तसेच National Rural Livelihood Mission अंतर्गत अनुसूचित जाती, जमातीतील दारिद्र्येरेषेखालील कुटूंबांना स्वयंसहाय्यता समुहांना खेळते भांडवल उपलब्ध करुन देण्यात येते तसेच बँकेचे कर्ज मिळवून देण्यासाठी आवश्यक ती मदत संबंधित यंत्रणेकडून करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हा परिषदेत कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या निवड-प्रक्रियेत झालेला गैरकारभार

**(४१) ४६४०५ (२१-०४-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ, जाहिरात क्रमांक/साप्रवि/आस्था-१/२००६/२०१५ दिनांक ५ नोव्हेंबर,२०१५ रोजी अंतर्गत सन २०१५-१६ कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या निवड-प्रक्रियेत मोठया प्रमाणात अनियमितता व गैरकारभार झाल्यामुळे त्यास स्थगिति देण्याबाबत लोकप्रतीनिधिंनी दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास राज्यमंत्री, यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार सन २०१५-१६ कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या निवड प्रक्रियेवर तात्काळ स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी दि.३१.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास चौकशी अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत सन

२०१५-१६ मध्ये घेण्यात आलेल्या कंत्राटी ग्रामसेवक पदाची निवडसूची शासनाच्या परिपत्रकातील तरतुदीनुसार केलेली आहे असे आढळून आले. या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्यानुसार अंतिम निवडसुची सुधारीत करणे आवश्यक ठरते. त्यामुळे कंत्राटी ग्रामसेवक या पदाची निवडसूची सुधारीत करुन त्याप्रमाणे भरतीची कार्यवाही करावी अशा सूचना शासनाच्या दि.१८.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हा, यवतमाळ यांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अचलपूर चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील तीर्थक्षेत्राच्या विकास कामासाठी निधी देण्याबाबत

**(४२) ४६५६८ (०३-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर चांदूरबाजार (जि.अमरावती) मतदार संघातील, संत श्री.गुलाबराव महाराज, भक्तिधाम प्रल्हादपुर, शिरजगाव बंड, ता.चांदूरबाजार करिता रु.१५० कोटीची निधी उपलब्धता, व दर्जा प्राप्त तीर्थस्थळ, बेलोरा, येथील विकास कामांना निधी व प्रशासकीय मान्यता, नानोरी येथील शहीद स्मारक करिता निधी उपलब्धता आदि मागण्याबाबत स्थानिक वि.स.स. अचलपूर यांनी दिनांक १६ जुलै,२०१५, दिनांक १९ जानेवारी,२०१६ रोजी मा.नियोजन मंत्री, दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी मा.पालकमंत्री, अमरावती, दिनांक २५ नोव्हेंबर,२०१४ रोजी मा.ग्रामविकास मंत्री तसेच सचिव, ग्रामविकास यांना पत्रान्वये मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निधी उपलब्धतेबाबत सामान्य प्रशासन विभागाने वित्त विभागास केलेल्या शिफारशीबाबत वित्त विभागाकडून कोणती कार्यवाही केली तसेच राज्यातील २०६ हुतात्मा स्मारकांकरिता युनिफॉर्म पॅटर्न आणि निधी उपलब्धतेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) नियोजन विभाग, शासन निर्णय, दिनांक ४ जून, २०१५ अन्वये श्री.गुलाबराव महाराज, भक्तिधाम प्रल्हादपुर, शिरजगाव बंड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती या तीर्थक्षेत्राचा प्रस्ताव जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने शासनास सादर करणेबाबत, जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र बेलोरा या तीर्थक्षेत्रास सन २०१४-१५ मध्ये पुंजाजी महाराज देवस्थान येथे भक्तनिवास बांधण्यासाठी रु.६१.७८ लक्ष इतक्या निधीची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात

आली असून त्यापैकी रु.२५.०० लक्ष इतका निधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी खर्च झाल्यावर पुढील निधी वितरीत करण्यात येईल.

नानोरी येथील शहीद स्मारक व राज्यातील २०६ हुतात्मा स्मारकांचे नुतनीकरण याबाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून धोरण ठरिवण्याचे काम सुरु आहे. सदर धोरण अंतिम झाल्यावर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दर्यापूर तालुक्यातील अंजनगाव सुर्जी परीसरातील शहानुर धरणाच्या कालव्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४३) ४६६०९ (२१-०४-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी परीसरामध्ये ४७ द.श.ल.क्ष. घनमीटर पाणी साठा असलेले शहानुर धरण असून कालव्याची दुरुस्ती नसल्याने शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचत नाही यामुळे धरणात पाणी असून केवळ कालव्यांच्या दुरुस्ती अभावी शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही कालव्यांच्या दुरुस्तीच्या कामामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१६) :** (१) नाही.

कालव्याची दुरुस्ती उपलब्ध अनुदानातून करण्यात येते आहे. अपु-या अनुदानामुळे काही ठिकाणी कालवा दुरुस्ती प्रलंबित आहे. त्यामुळे पाणी मिळण्यास अडचणी जातात. तथापि या प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मलकापूर तालुक्यातील मौजे तिघ्रा ते भानगुरा या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ४७८७० (०४-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे तिघ्रा ते भानगुरा हा एकूण दीड कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकरी व ग्रामस्थांना दळवळणासाठी गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि, सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे तिघ्रा ते भानगुरा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.२२ चा भाग रस्ता असून त्याची लांबी २.०० कि.मी. आहे. संपूर्ण लांबी डांबरीपृष्ठभागाची असून ०/०० ते १/०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील मौजे भानगुरा ते रणथम येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४५) ४७८७७ (०४-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील मौजे भानगुरा ते रणथम हा एकूण दीड कि.मी.लांबीचा रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांना दळणवळणासाठी गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापू मतदार संघातील मौजे भानगुरा ते रणथम हा रस्ता सन २००-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.२२ चा भाग रस्ता असून त्याची लांबी २.०० कि.मी. आहे.

रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ मध्ये सदर रस्त्याच्या ०.५०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम मंजूर असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील मौजे अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४६) ४७८८० (०४-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा हा एकूण दीड कि.मी.लांबीचा रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांना दळणवळणासाठी गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरणासाठी ३० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे अनुराबाद फाटा ते अनुराबाद पान्हेरा हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र. २९ असून त्याची लांबी ८.९५० कि.मी. आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमाधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील मौजे भानगुरा ते विवरा येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) ४७८८१ (०४-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे भानगुरा ते विवरा हा एकूण दोन कि.मी.लांबीचा रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांना दळणवळणासाठी गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ४५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौज भानुगुरा ते विवरा हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.३० चा भाग रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी २.६० कि.मी. आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत २.०० कि.मी. लांबीचे मातीकाम प्रगतीत असून त्यावर मुरुमीकरणाचे काम प्रस्तावित आहे.

सदर रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी न निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

### मलकापूर तालुक्यातील मौजे घीर्णी ते माक्नेर येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४८) ४७८८२ (०४-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील मौजे घीर्णी ते माक्नेर हा एकूण दोन कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने ग्रामस्थांना दळणवळणासाठी गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ४५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) घीर्णी ते माकनेर ता.मलकापूर हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३३ चा भाग रस्ता असून सदर रस्त्याची लांबी २.०० कि.मी. आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सन २०१५-१६ अंतर्गत प्रश्नांकित रस्त्याचे काम मंजूर आहे.

---

**मलकापूर तालुक्यातील मौजे नरवेल ते हरसोडा या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४९) ४७८९० (०५-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील मौजे नरवेल ते हरसोडा हा एकूण दोन कि.मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी ४० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील मौजे नरवेल ते हरसोडा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र. २४ चा भाग रस्ता असून सदर रस्त्याची लांबी ४.०० कि.मी. आहे.

प्रश्नाकिंत रस्त्याच्या ०/०० ते २/५०० कि.मी. लांबी खडीकरणाची असून सुस्थितीत आहे. व २/५०० ते ४/०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम सन २०१५-१६ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमात मंजूर आहे.

वरील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेच्या घरकुलाचे कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(५०) ४९३१६ (२९-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षामधील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेचे एकूण १७० घरकुलाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १७० घरकुलाचे काम त्वरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१६) :** (१) होय.

(२) सदर घरकुलाची कामे ही लाभार्थ्याने स्वत: पूर्ण करावयाची असल्याने पंचायत समिती स्तरावरुन लाभार्थ्यांना अपूर्ण घरकुलांची कामे त्वरीत पूर्ण करण्यासाठी वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.